**शासकीय कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मंजूरीबाबत.... प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजूरीच्या अधिकारांबाबत सुधारणा .**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः वैखप्र-२०१६/प्र.क्र.१६/२०१६/राकावि-२**
गो. ते. रुग्णालय आवार, १० वा मजला,
मंत्रालय, मुंबई - ०१
दिनांक: १६ मार्च, २०१६

वाचा :-

१) **शासन निर्णय क्रमांकः वैखप्र-२०११/प्र.क्र.३३३/११/राकावि-२, दि. १६ नोव्हेंबर, २०११**

प्रस्तावना :-

शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल), नियम, १९६१ मधील तरतुदीच्या अधीन राहून, आकस्मिक उद्भवणाऱ्या २७ आजारांवर खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारांवरील तसेच ५ गंभीर आजारांवर, शासनाने संपूर्ण खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारावरील, वैद्यकीय खर्चाच्या प्रत्येक प्रकरणी रु.१.०० लाख च्या कमाल मयोदेत, प्रतिपूर्तीस मंजूरी देण्याचे अधिकार विभाग प्रमुखांना आहेत. या मर्यादेवरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची प्रकरणे संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडे सादर केली जातात. सद्य:स्थितीत औषधाच्या किंमतीत व उपचार पध्दतीवरील खर्चामध्ये झालेली वाढ तसेच अशी प्रकरणे निकाली काढण्यास लागणारा कालावधी इत्यादींचा विचार करता प्रचलित कमाल मर्यादेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. वैखप्र-२०११/प्र.क्र.३३३/११/राकावि-२, दि. १६ नोव्हेंबर, २०११ मध्ये प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजूरीचे अधिकारांबाबत खालीलप्रमाणे सुधारणा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

१) महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधीन राहून **रु. ३.००,०००/- (अक्षरी रुपये-तीन लाख फक्त ) पर्यंतच्या** वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस मंजूरीचे अधिकार संबंधित विभागांच्या विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात येत आहेत.

२) **रु. ३.००,०००/- (अक्षरी रुपये-तीन लाख फक्त )वरील** वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधीन राहून मंजूरी देण्याचे अथवा उचित निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार संबंधित **मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यात येत आहेत.**

२) शासन याद्वारे असे निर्देश देत आहे की, वर नमूद केल्याप्रमाणे विभागप्रमुख व प्रशासकीय विभागप्रमुख या स्तरावर प्रकरणांना मंजूरी देताना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यांनतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदी काटेकोरपणे तपासून मंजुरी देण्यात यावी.

३) **हा शासन निर्णय प्रलंबित प्रकरणांना देखील लागू करण्यात यावा.**

४) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी हा शासन निर्णय त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व कार्यासने व कार्यालये यांना कळविण्याची व्यवस्था करावी.

५) हे आदेश महाराष्ट्र राज्याच्या विधानमंडळाचे सभापती, उपसभापती, अध्यक्ष, उपाध्यक्ष,महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री,मा.मंत्री,मा.राज्यमंत्री,विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानमंडळाचे विद्यमान व माजी सदस्य,शासकीय कर्मचारी व या सर्वांचे कुटुंबिय यांना लागू राहतील.

६) हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ५/१६/सेवा-५, दिनांक-१५/०२/२०१६ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०३१६१५५३०५१६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay Hanumant Karanjekar

Digitally signed by Sanjay Hanumant Karanjekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b99b44ea258328f478ad96b0055c84973eb45cf0720231d99a94225c705bc1be, cn=Sanjay Hanumant Karanjekar
Date: 2016.03.23 17:09:52 +05'30'

**( सं. ह. करंजेकर)**
महाराष्ट्र शासनाचे, उप सचिव

प्रत,

मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई ( दोन प्रती).
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव/सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (५ प्रती)
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती)
सेटलमेंट कमिशनर ॲण्ड डायरेक्टर ऑफ लँड रेकॉर्डस, पुणे (२ प्रती)
विभागीय आयुक्त (सर्व) (प्रत्येक २ प्रती)
जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे) (प्रत्येक २ प्रती)
मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद (२ प्रती)
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा), मुंबई (२ प्रती)
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा), नागपूर (२ प्रती)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (१० प्रती)
सहसंचालक, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई. (१० प्रती)
चीफ ऑडिटर लोकल फंडस अकाऊटंस, मुंबई ( १० प्रती)
सर्व कोषागार अधिकारी, (प्रत्येकी ५ प्रती)
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई (५० प्रती)
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई (५० प्रती)
संचालक, आयुर्वेद, मुंबई (२५ प्रती)
संचालक, राज्य कामगार विमा योजना, मुंबई (२५ प्रती)
व्यवस्थापकीय संचालक, हाफकीन बायो-फार्मास्युटिकल कॉर्पोरेशन, परेल, मुंबई (२ प्रती)
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई (५ प्रती)
सह संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व)
प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई.
प्रोथोनोटरी व सिनियर मास्टर, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई (५ प्रती)

वित्त विभाग (कार्यासन सेवा-५), मंत्रालय, मुंबई (१० प्रती)
व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई (२ प्रती)
सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना कार्यासन), मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती (राकावि-२), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,मुंबई.

---

२. मंत्रालयीन विभागाच्या सर्व आस्थापना कार्यासनास विनंती करण्यात येते की, त्यांनी शासन निर्णयाच्या प्रती त्यांच्या सर्व संबंधित कार्यासनांना पाठवाव्यात. तसेच संबंधित कार्यासनाने त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना पाठवाव्यात.

******